किरकोळ.फौ.ख्र. क्र.४६७/२०२६
**रहीम वि. दिनेश.**

**फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २२३ अंतर्गत फिर्यादीचे शपथेवर सत्यापन**

**मी प्रतिज्ञेवर कथन करतो ते येणेप्रमाणे,**
माझे नांव - **रहीम इस्माईल शेख**,
वय- ३६ वर्षे, काम धंदा:- पेंटर,
रा. खंडाळा, ता. मावळ, जि. पुणे.

**०१.** दि. ०४/०४/२०२६ रोजी मी रात्री ९.०० ते ९.३० वाजता मी खंडाळा बाजार येथुन माझे घरी मोटारसायकलरून एकटा जात होतो. त्यावेळी मी निलकंठेश्वर मंदिर, खंडाळा जवळ मला दिनेश अडीलकर याने मला अडवीले. तो मला काय बघतो असे म्हणुन मला शिवीगाळ करीत होता. मी त्यास काय झाले असे विचारणा केली असता त्याने मला चापट मारली. त्यावेळी अजय टेमघरे तेथे सोडवण्यास आला. त्यास देखील गैरअर्जदार दिनेश याने मध्ये पडु नको असे सांगितले. त्यानंतर आमच्यामध्ये सोडवा सोडव केली आम्ही घरी गेलो. त्यानंतर मी पोलीस स्टेशनमध्ये तक्रारी अर्ज दाखल केला. परंतु पोलीसांनी त्यावर काहीही कार्यवाही केली नाही. म्हणुन मी प्रस्तुतची फिर्याद दाखल केलेली आहे. या व्यतिरिक्त मला काही सांगावयाचे नाही.

..................................

**( रहीम इस्माईल शेख ),**
**साक्षीदाराची सही.**
दि. २९/०७/२०२६.

साक्षीदारास वाचून दाखविले व बरोबर असल्याचे मान्य केले.

२९/७/२६

**(ए.एम.विभूते),**
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,
वडगांव मावळ, पुणे.

**श्रवणोत्तर स्विकृत,**

**(ए.एम.विभूते),**
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,
वडगांव मावळ, पुणे.

किरकोळ.फौ.ख. क्र.४६७/२०२६
**रहीम वि. दिनेश.**

**फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २२३ अंतर्गत फिर्यादीचे शपथेवर सत्यापन**

**मी प्रतिज्ञेवर कथन करतो ते येणेप्रमाणे,**

माझे नांव - **अजय जगन्नाथ टेमघरे**,
वय- ३४ वर्षे, काम धंदा:- भाजी व्यवसाय,
रा. कुसगांव बु., ता. मावळ, जि. पुणे.

**०१.** दि. ०४/०४/२०२६ रोजी रात्री ९.३० वाजता मी निलकंठेश्वर मंदिर, खंडाळा येथे उभा होतो. त्यावेळी रहीम व दिनेश यांची शिवीगाळ धक्काबुक्की सुरु होती. त्यावेळी मी सोडवण्यास गेलो. त्यावेळी दिनेश याने मला आई वडीलांवर शिवीगाळ केली. सदर घटना मी माझ्या घरच्यांना सांगितली. त्यानंतर अर्जदार यांनी पोलीस स्टेशनमध्ये तक्रारी अर्ज दाखल केला. परंतु पोलीसांनी त्यावर काहीही कार्यवाही केली नाही. म्हणुन अर्जदार यांनी प्रस्तुतची फिर्याद दाखल केलेली आहे. या व्यतिरिक्त मला काही सांगावयाचे नाही.

..............................................

**( अजय जगन्नाथ टेमघरे ),**
**साक्षीदाराची सही.**

दि. २९/०७/२०२६.

**श्रवणोत्तर स्विकृत,**

साक्षीदारास वाचून दाखविले व बरोबर असल्याचे मान्य केले.

२९/७/२६

**(ए.एम.विभूते),**
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,
वडगांव मावळ, पुणे.

**(ए.एम.विभूते),**
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,
वडगांव मावळ, पुणे.